
## स्टँडफोर्ड युनिव्हर्सिटीच्या क्रमवारीत

# विद्यापीठातील दोन प्राध्यापकांना स्थान



डॉ. पाटील



प्रा. राजापुरे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

अमेरिकेतील स्टँडफोर्ड विद्यापीठाने जाहीर केलेल्या जागतिक संशोधकांच्या क्रमवारीत शिवाजी विद्यापीठातील विविध विषयांमधील प्राध्यापकांनी स्थान मिळविले आहे.

जगभरातील विविध विषयांवरील शास्त्रज्ञांची शैक्षणिक संशोधन गुणवत्ता संदर्भातील क्रमवारी कॅलिफोर्नियातील स्टँडफोर्ड विद्यापीठाने तयार केली. यासाठी प्राध्यापकांनी सादर केलेले संशोधन पेपर, सायटेशनस, शैक्षणिक क्षेत्रातील अनुभव यासह विविध निकषाच्या आधारे मानांकन देण्यात आले. यासंदर्भातील माहिती १६ ऑक्टोबर रोजी विद्यापीठाने जर्नलमध्ये प्रकाशित केली आहे. यात विद्यापीठातील भौतिकशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. पी. एस. पाटील हे अप्लाईड फिजिक्सच्या संशोधनात देशात पाचव्या क्रमांकावर आहेत. प्रा. के. वाय. राजापुरे, प्रा. ए. व्ही. राव (मटेरियल्स सायन्स), प्रा. जे. पी. जाधव, प्रा. सचिन भालेकर यांनीही विविध विषयांमधील संशोधनात क्रमवारीत स्थान मिळविले आहे.

# सीमाभागातील विद्यार्थी शैक्षणिक संकुलाबाबत मुख्यमंत्र्यांसमवेत चर्चा

■ लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : सीमाभागातील विद्यार्थ्यांसाठी शिवाजी विद्यापीठाअंतर्गत सुरू केल्या जाणाऱ्या शैक्षणिक संकुलाबाबत मंगळवारी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासमवेत मुंबईत चर्चा झाली.

गेल्या तीन दिवसांपूर्वी उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत हे कोल्हापूर दौऱ्यावर आले होते. त्यावेळी त्यांनी सीमाभागातील या संकुलाची सुरुवात करण्यासाठी त्याची राज्याच्या बृहत आराखड्यामध्ये नोंद करण्याबाबत मुंबईत बैठक होणार असल्याचे सांगितले होते. त्यानुसार महाराष्ट्र राज्य उच्चशिक्षण व विकास आयोगाची बैठक मुख्यमंत्री ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृहामध्ये झाली.

या संकुलाची बृहत आराखड्यामध्ये नोंद करण्याबाबत चर्चा करण्यात आली. यावेळी मंत्री सामंत, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे अधिकारी, आदी उपस्थित होते. दरम्यान, या बृहत आराखड्यामध्ये नोंद झाल्यानंतर शैक्षणिक संकुलाबाबतच्या पुढील कार्यवाहीला गती मिळणार आहे.

# एम.एस्सी.सह तत्सम अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा शनिवारपासून



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या २०२०-२१ या शैक्षणिक वर्षातील एम.एस्सी. व तत्सम अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्ष प्रवेश परीक्षा दि. ७ ते १२ नोव्हेंबर या कालावधीत ऑफलाईन पद्धतीने घेण्यात येणार आहेत, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील विद्यापीठ अधिविभाग व संलग्नित महाविद्यालयात शिकविल्या जाणाऱ्या एम.एस्सी. व इतर पदव्युत्तर अभ्यासक्रमांची प्रवेश परीक्षा शनिवारी (दि.७) ऑफलाईन पद्धतीने घेण्याचे नियोजन विद्यापीठाने केले आहे. या अनुषंगाने सविस्तर माहिती दि. ५ रोजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर http://www.unishivaji.ac.in/mscadmission/admission2020 या लिंकवर ठेवण्यात येणार आहे, असे कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांनी कळविले आहे.

# शिवाजी विद्यापीठाच्या प्रवेश परीक्षा ७ पासून

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या २०२०-२१ या शैक्षणिक वर्षातील एम.एस्सी. व तत्सम अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्ष प्रवेश परीक्षा येत्या ७ ते १२ नोव्हेंबर या कालावधीत घेण्यात येणार आहेत. या परीक्षा ऑफलाईन पद्धतीने होतील, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली. विद्यापीठ अधिविभागात तसेच संलग्नित महाविद्यालयांत शिकविल्या जाणाऱ्या एम.एस्सी. व तत्सम पदव्युत्तर अभ्यासक्रमांची प्रवेश परीक्षा शनिवार, दि. ७ नोव्हेंबरपासून ऑफलाइन पद्धतीने घेण्याचे नियोजन विद्यापीठाने केले आहे. या अनुषंगाने सविस्तर माहिती गुरुवार, दि. ५ नोव्हेंबर रोजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

# शिवाजी विद्यापीठाच्या प्रवेश परीक्षा शनिवारपासून

कोल्हापूर, ता. ३ : शिवाजी विद्यापीठाच्या २०२०-२१ या शैक्षणिक वर्षातील एम.एस्सी. व तत्सम अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्ष प्रवेश परीक्षा येत्या शनिवार (ता. ७)पासून गुरुवार (ता. १२)पर्यंत ऑफलाईन पद्धतीने घेण्यात येणार आहेत, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदिवडेकर यांनी दिली आहे. एम.एस्सी. व तत्सम पदव्युत्तर अभ्यासक्रमांची प्रवेश परीक्षा ऑफलाइन घेण्याचे नियोजन आहे. या अनुषंगाने तपशील गुरुवारी (ता. ५) विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील http://www.unishivaji.ac.in/mscadmission/admission२०२० लिंकवर ठेवण्यात येणार आहे, असेही कुलसचिवांनी कळविले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 NOV 2020
तरुण भारत



# विद्यापीठाच्या प्रवेश परीक्षा शनिवारपासून सुरु

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रियांचे वेळापत्रक मंगळवारी जाहीर करण्यात आले. शनिवार (७) ते गुरुवार (१२) दरम्यान ही प्रवेश प्रक्रिया घेण्यात येणार आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली आहे.

कोरोनामुळे यंदाच्या शैक्षणिक वर्षाचे गणित कोलमडले होते. मात्र आता परिस्थीती हळूहळू पूर्वपदावर येत आहे. २०२०-२१ या शैक्षणिक वर्षातील एम.एस्सी.सह इतर अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्ष प्रवेश परीक्षांचे नियोजन करण्याचे काम सुरु केले आहे. याचा तपशील गुरुवारी (५) रोजीं विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात येणार आहे. या परीक्षा दि. ७ ते दि. १२ दरम्यान ऑफलाइन पद्धतीने घेण्याचे नियोजन विद्यापीठाने केले आहे.

# दूरशिक्षण केंद्राच्या प्रवेश प्रक्रियेस ३० नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ दूरशिक्षण केंद्राच्या प्रथम, द्वितीय व तृतीय वर्ष प्रवेशासाठी दि. ३० नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे, अशी माहिती दूरशिक्षण केंद्राचे उपकुलसचिव डॉ. एन. जे. बनसोडे यांनी दिली. विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली यांच्याकडून विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्राकडील सर्व अभ्यासक्रमांना मान्यता मिळाली आहे. प्रवेश प्रक्रिया मुदतवाढीसाठी विद्यापीठ प्रशासनाने 'यूजीसी'चे उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन यांच्याकडे पाठपुरावा केला होता. प्रवेशापासून वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमांना प्रवेश घ्यावा, असे आवाहन दूरशिक्षण केंद्राचे संचालक प्रा. डॉ. एम. ए. अनुसे यांनी केले आहे.

# दूरशिक्षण केंद्राच्या प्रवेशास मुदतवाढ

■ लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** विद्यापीठ अनुदान आयोगाकडून (युजीसी) शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्रातील सर्व अभ्यासक्रमांना मान्यता मिळाली आहे. बी. ए., बी. कॉम., एम. ए. भाषा आणि सामाजिकशास्त्रे, एम. एस्सी. (गणित), पी.जी. डिप्लोमा इन ट्रान्स्लेशन या पदवी आणि पदव्युत्तर विषयांची प्रवेश प्रक्रिया गेल्या १५ दिवसांपूर्वी सुरू झाली. त्यात अर्ज करण्याची मुदत दि. ३१ ऑक्टोबरपर्यंत होती. मात्र, युजीसीने अंतिम मुदत दि. ३० नोव्हेंबरपर्यंत वाढविली आहे.

# दूरशिक्षण केंद्राच्या प्रवेशास मुदतवाढ

कोल्हापूर : विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली यांच्याकडून शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्राकडील सर्व अभ्यासक्रमांना मान्यता देण्यात आली आहे. दि. ३० नोव्हेंबरपर्यंत ही मुदतवाढ देण्यात आली आहे, अशी माहिती दूरशिक्षण केंद्राचे उपकुलसचिव डॉ. एन. जे. बनसोडे यांनी दिली. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षांसाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. यामध्ये बी.ए., बी. कॉम., एम. ए., एम.एस्सी., पी. जी. डिप्लोमा इन ट्रान्सलेशन या पदवी व पदव्युत्तर विषयांची शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठीची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. प्रवेश घेण्याची अंतिम तारीख दि. ३० नोव्हेंबर आहे.

# पाच पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे निकाल घोषित

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा विभागातर्फे मंगळवारी पी. जी. डिप्लोमा इन ई- बिझनेस, डिप्लोमा इन रशियन, हायर डिप्लोमा इन रशियन, पी. जी. डिप्लोमा इन ऑनलाईन जर्नालिझम आणि एल. एल. एम. फायनल ईअर अशा पाच पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमांचा निकाल घोषित करण्यात आला. तर अंतिम वर्षांच्या ३२ अभ्यासक्रमांच्या परीक्षा ऑनलाईन आणि ऑफलाईन पध्दतीने घेण्यात आल्या. दिवसभरात परीक्षेसाठी ३९ हजार ६५५ विद्यार्थ्यांपैकी ३९ हजार ०१६ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने आणि ९,६३६ विद्यार्थ्यांपैकी ८ हजार ९१० विद्यार्थ्यांनी ऑफलाईन पद्धतीने परीक्षा दिली. विद्यार्थ्यांना येणाऱ्या तांत्रिक अडचणीचे निराकरण विविध माध्यमातून करण्यात आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 NOV 2020
तरुण भारत

# विद्यापीठाच्या परीक्षा अंतिम टप्प्यात

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या शेवटच्या सत्राच्या परीक्षा आता शेवटच्या टप्प्यात आल्या आहेत. इंजिनिअरींग, एमबीए., बीएससी, एम.एस.डब्ल्यू, एम. एस.सी, फार्मसीसह अन्य अभ्यासक्रमांच्या परीक्षा पूर्ण झाल्या आहेत. मंगळवारी तीनही सत्रात ३२ अभ्यासक्रमांच्या परीक्षा पार पडल्या. यामध्ये ३९ हजार विद्यार्थ्यांनी ऑनलाईन तर ८ हजार ९०० विद्यार्थ्यांनी ऑफलाईन पद्धतीने परीक्षा दिल्या. मंगळवारी पी. जी. डिप्लोमा इन ई बिझनेस, डिप्लोमा इन रशियन, हायर डिप्लोमा इन रशियन, पी. जी. डिप्लोमा इन ऑनलाईन जर्नालिझम, एलएलएम अंतिम वर्षाच्या या पाच पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले. मंगळवारी पहिल्या सत्रात बीटेक, एमएससी, एमए., बीसीए, एमबीए, बीबीए, बी. टेक्सटाईल, बीएफ, टीएम, बी. लायब्ररी, एम. लायब्ररी, बीए, बी. ई, बीएससी, लॉ, या अभ्यासक्रमांच्या तर दुसऱ्या सत्रात बीटेक, एमएससी, एमए, बीसीए, एमबीए, बीबीए, बीकॉम तर तिसऱ्या सत्रात बी. टेक्सटाईल, बी. लायब्ररी, एम. लायब्ररी, बी. जे., बीएसस्सी, एमए., बीए, बी. एड, एम. एड, बीपीएड या अभ्यासक्रमांच्या परीक्षा पार पडल्या.

# ऑनलाईन परीक्षेसाठी ३९ हजार विद्यार्थी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ अंतिम वर्ष परीक्षेअंतर्गत मंगळवारी ३९ हजार १६ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन व ९ हजार ६३६ पैकी ८ हजार ९१० विद्यार्थ्यांनी ऑफलाईन पद्धतीने परीक्षा दिली.

दरम्यान, पी. जी. डिप्लोमा इन ई-बिझनेस, डिप्लोमा इन रशियन, हायर डिप्लोमा इन रशियन, पी. जी. डिप्लोमा इन ऑनलाईन जर्नालिझम, एल.एल.एम. अंतिम वर्ष अशा पाच पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमांचा निकाल घोषित करण्यात आला आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे यांनी दिली.

# अंतिम वर्षाच्या ३९ हजार विद्यार्थ्यांची परीक्षा

लोकमत न्यूज नेटवर्क, कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील बी. टेक., एम. एस्सी., एम. ए., बीसीए, अशा विविध ३२ अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाच्या ३९०१६ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा दिली. ८९१० विद्यार्थ्यांनी ऑफलाईन परीक्षा दिली. सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षातील एम.एस्सी. व तत्सम अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्ष प्रवेश परीक्षा शनिवार (दि. ७) ते दि. १२ नोव्हेंबरदरम्यान ऑफलाईन पद्धतीने होणार आहेत. त्याबाबतचा तपशील उद्या, गुरुवारी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध होईल, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 4 NOV 2020
तरूण भारत

# अधिव्याख्यातापदासाठीची सेट परीक्षा २७ डिसेंबरला

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे महाराष्ट्र व गोवा राज्यात अधिव्याख्यातापदासाठी घेण्यात येणारी व दिनांक २८ जून २०२० रोजी आयोजित



केलेली सेट परीक्षा कोविड–१९ च्या वाढत्या प्रादुर्भावामुळे पुढे ढकलण्यात आली होती. आता ही परीक्षा २७ डिसेंबर २०२० ला आयोजित करण्यात आली आहे. परीक्षेबाबतची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.